INTERNATIONAL RESEARCH FELLOWS

Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March-2018

Vol. 5 Issue 1

Chief Editor :

Dr. Dhanraj T. Dhangar,

Assist. Prof. (Marathi)

MGV'S Arts & Commerce College,

Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

|| Home ||

You searched for research journey

Total Journals : 2

Show 25 entries Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yeola | | 23487143 |
| | 2 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries

Previous 1 Next

This Journal is indexed in :

- Dictionary of Research Journal Index (DRJI)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)

RESEARCH JOURNEY

254

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) | Vol. 5, Issue 1
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 Jan-Feb-March 2018


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 23 | कोंकणी भाषा के ऐतिहासिक चरण | प्रा. नित्यानंद नायक | 112 |
| 24 | सरोजस्मृति : एक शोकगीत | डॉ. वंदना पाटील | 115 |
| 25 | कवयित्री पद्मा पाटील कृत कविता 'मिसाल':एक यथार्थ चित्रण | डॉ. गीता दोडमणी | 118 |
| 26 | जीवन के चौथेपन कि त्रासदी - 'गिलीगडू' | डॉ. कल्पना पाटील | 122 |
| 27 | 'प्रो. सुस्मिता' – शिक्षा जगत् कि विसंगतीयों का यथार्थ चित्रण | प्रा. माधवराव जोशी | 125 |
| 28 | जैनेन्द्र के उपन्यासों में नारी चित्रण | डॉ. भारत खिलारे | 129 |
| 29 | डॉ. कैलाशचंद्र शर्मा के उपन्यासों का अनुशीलन | डॉ. संजय ढोंडरे | 133 |
| 30 | निराला कि कविता | प्रा. कविता पाटील | 136 |
| 31 | शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण | प्रा.शिल्पा शेटे | 139 |
| 32 | छ. शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी केलेले कार्य | डॉ. रंजना कदम | 142 |
| 33 | आगरकर व सावरकर चारिक धागाएक वै | प्रा. संतोष शेलार | 149 |
| 34 | डॉ. आंबेडकरांची दलित चळवळ आणि आंबेडकरोत्तर चळवळ | डॉ. सुशांत चिमणकर | 155 |
| 35 | सावरकरांचे समाजकारण | प्रा. एस. सी. शेलार | 164 |
| 36 | लेडी ठाकरसी यांचे स्त्री शिक्षणातील योगदान | डॉ. अनिल पवार | 167 |
| 37 | भारतीय प्रबोधनात परदेशी महिलांचे योगदान | डॉ. माधवी खरात | 170 |
| 38 | सोशल मीडियातील महिला विषयक संदेशाचे आशय विश्लेषण (विशेष संदर्भ - व्हॉट्सॲप ग्रुप) | डॉ. विनोद नीताळे व डॉ. सुधीर भटकर | 174 |
| 39 | महिलांची आर्थिक अधिकारांविषयी जागरुकता | डॉ. सुनीता रविदास | 179 |
| 40 | महिला सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास महामंडळाची भूमिका | डॉ. बी. आर. गायकवाड व प्रा. ज्ञानेश्वर खोजे | 183 |
| 41 | आदिवासी स्त्रियांचे कुटुंबातील स्थान : एक सामाजिक अभ्यास | डॉ. जी. बी. लांब | 188 |
| 42 | मध्य कालीन माहूरवरील राजवटीचा अभ्यास | डॉ. दत्ता जाधव | 192 |
| 43 | महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा-सुविधांची उपलब्धता व खर्च प्रवृत्ती | डॉ. बी. आर. गायकवाड | 196 |
| 44 | विस्थापितांचे प्रश्न | प्रा. बाळकृष्ण रामटेके | 204 |
| 45 | किनवट तालुक्यातील आदिवासींच्या समस्या व उपाययोजना | डॉ. जी. बी. लांब | 209 |
| 46 | भारतातील बाजार नियंत्रण | डॉ. शहाजीराव वारके | 214 |
| 47 | कृषी पर्यटनातील अर्थ संधी | प्रा. सुलक्षणा कोळी | 218 |
| 48 | भारतातील राष्ट्रीय कृषी विमा योजना एक अभ्यास | डॉ. बी. आर. गायकवाड व प्रा. ज्ञानेश्वर खोजे | 222 |
| 49 | नोटा बंदी : एक दिव्य स्वप्न | प्रा. मनोजकुमार भोवते | 230 |
| 50 | महाराष्ट्रातील बाजार समिती | डॉ. शहाजीराव वारके | 233 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) | Vol. 5, Issue 1
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 Jan-Feb-March 2018

पिकांवरील रोगराई, कीड प्रादूर्भाव, शेती मालाच्या अल्प किंमती, सरकारची बदलणारी धोरणे, उत्पादन प्रमाणातील बदल, नवीन आधुनिक तंत्र व उत्पादन पद्धतीचा अवलंब, जमीनदार, बँकांची कार्यपद्धती, शेती मजुरावरील अवलंबित्व व शेतकऱ्यांचे अपघात यामुळे शेतीत मोठ्या प्रमाणावर धोका व अनिश्चितता निर्माण होतात. या अनिश्चितता, धोके पत्करून भविष्यकाळात उत्पादन काढणे कठिण असते. मात्र शेतीतील अनिश्चितता कमी करण्यासाठी विमा काढणे, बहू उत्पादन पद्धतीचा स्वीकार, उत्पादन करार, लवचिकता व रोखता कायम ठेवणे या मार्गाचा वापर करण्यात येतो.[१]

**पीक विमा योजना पार्श्वभूमी:[२]**

भारतात २०व्या शतकाच्या शेवटी पीक विमा ही संकल्पना कृषी क्षेत्रामध्ये जोखीम व्यवस्थापनाच्या उद्देशाने स्विकारण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व काळात १९१५ मध्ये म्हैसूर राज्याचे श्री. जे. एस. चक्रवर्ती यांनी शेतकऱ्यासाठी अतिवृष्टी व कोरडा दुष्काळ यामध्ये होणाऱ्या नुकसानीची नुकसान भरपाई करण्यासाठी 'पाऊस विमा' संकल्पना सूचविली होती. ही योजना 'क्षेत्रीय दृष्टीकोन' यावर आधारीत असून त्यांनी 'म्हैसूर आर्थिक जर्नल' मधून पाऊस विमा या संकल्पनेच्या संदर्भात आपले शोध लेख प्रकाशित केले आहेत. ही योजना मद्रास, देवास आणि बडोदा या राज्यात लागू करण्यात आली. मात्र या पीक विमा योजनेस अत्यंत कमी प्रमाणात यश मिळाले आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पीक विमा हळूहळू अधिकाधिक चर्चेत येऊ लागला. संसदेत १९४७ मध्ये या विषयावर चर्चा करून तत्कालीन अन्न व कृषी मंत्री डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सरकारच्या बाजूने पीक विम्याची आवश्यकता विचारात घेऊन पीक विमा सुरू करण्याचे आश्वासन दिले. तसेच आधुनिक आणि प्रगत कृषी आदानांचा अवलंब व वापर करण्यास विशेष आर्थिक साहाय्य देण्यात आले. याचाच एक भाग म्हणून देशात १९६०–६५ या कालखंडात हरितक्रांती यशस्वी करून दाखविण्यात आली. आणखी एक योगायोग म्हणजे १९६५ पासून शेतीतील धोके कमी करण्यासाठी विमा विधेयक संसदेत मांडण्यात आले. १९७० मध्ये या विधेयकाचा मसुदा व मॉडेल योजना डॉ. धर्म नारायण यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीकडे पाठविण्यात आला.

देशात सर्वप्रथम कृषी विमा योजना १९७२–७३ मध्ये विविध प्रयोग, तात्पुरती व विखुरलेल्या प्रदेशात राबविण्यात आली. प्रथम वैयक्तिक दृष्टीकोन आधारीत विमा योजना या नावाने एच–४ वाणाच्या कापूस पिकासाठी भारतीय जीवन विमा निगमाच्या साधारण विमा विभागाद्वारे सुरु करण्यात आली. नंतर यात भूईमूग, गहू आणि बटाटा या पिकांचा सामावेश करण्यात आला. तसेच गुजरातसह महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल या राज्यात ही योजना लागू करण्यात आली. १९७८–७९ पर्यंत केवळ ३११० शेतकऱ्यांना या योजनेचे संरक्षण प्राप्त झाले. या योजनेच्या माध्यमातून ४.५४ लाख रूपये विमा हप्त्याच्या पोटी ३७.८८ लाख रूपये नुकसान भरपाई देण्यात आली. मात्र देशातील पीक विमा योजना ही वैयक्तिक दृष्टीकोनावर आधारीत असल्याने देशात व्यवहार्य व शाश्वत ठरू शकणार नाही असे दिसून आले.

भारतातील पीक विम्याचे जनक प्रा.वि.म.दांडेकर यांनी ७० च्या दशकात क्षेत्रीय दृष्टीकोन आधारीत पीक विमा योजना सूचविली. शेतकऱ्यांच्या शेतीस विमा संरक्षण देण्याविषयी भारत सरकारच्या साधारण विमा महामंडळाने १९७९ मध्ये पथदर्शक पीक विमा योजना सुरू करण्यासाठी राज्य सरकारांना सूचना देण्यात आल्या. सदरील योजना संस्थात्मक कर्ज घेणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक स्वरूपाची होती. या योजनेद्वारे तृणधान्ये, बाजरी, तेलबिया, कापूस, बटाटा आणि वटाणा इत्यादी पिकांना विमा संरक्षण देण्यात आले. उंबरठा पातळीपेक्षा पीक उत्पादन कमी असल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षणाचा लाभ मिळतो. पथदर्शक पीक विमा योजना [illegible] पर्यंत सुरु राहिली असून त्यात देशातील १३ राज्यांनी सहभाग नोंदविला आहे. या योजनेत ६.२३ [illegible] शेतकऱ्यांना १.९३ कोटी [illegible] विमा हप्ता देऊन संरक्षण प्राप्त [illegible] आले आहे.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013) | Vol. 5, Issue 1
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 Jan-Feb-March 2018

राष्ट्रीय कृषी विमा योजनेची उद्दीष्टे:

१. नैसर्गिक आपत्तीमध्ये तसेच कीड व रोगराई प्रादूर्भाव झाल्यास अधिसूचित पीक नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना विमा संरक्षण, आर्थिक मदत देणे.

२. शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे आधुनिक तंत्रज्ञान आणि उच्च प्रतीची सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.

३. पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीत ही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य आबाधित राखणे.

या योजनेच्या या उद्दीष्टावरून असे दिसून येते की, शेतकऱ्यांच्या पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास नुकसानीच्या प्रमाणात विमा संरक्षण देणे, आर्थिक मदत करणे, नवीन तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे आणि पीक नुकसानीच्या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवणे.

संरक्षित पिके:

राष्ट्रीय कृषी विमा योजनेत पुढील पिकांचा सामावेश करण्यात आला आहे.

अ) अन्नधान्य (तृणधान्ये व कडधान्य):

खरीप व उन्हाळी भात, खरीप व रब्बी ज्वारी, बाजरी, गहू, नाचणी, तूर, उडीद, मूग, हरभरा, मका इत्यादी.

ब) गळीत धान्य:

खरीप व उन्हाळी भूईमूग, सोयाबीन, सूर्यफूल, तीळ, कारळे व करडई इत्यादी.

क) नगदी पिके:

ऊस, कापूस व कांदा इत्यादी.

या योजनेत बहूतेक सर्व पिकांचा सामावेश केलेला दिसून येतो.

विमा संरक्षण:

शेतकऱ्यांना टाळता न येणाऱ्या कारणांमुळे झालेल्या पीक नुकसानीस विमा संरक्षण देण्यात येते यात नैसर्गिक आग, वादळ, गारपीट, अतिवृष्टी, वीज कोसळणे, चक्रीवादळ, तूफान, पूर, भूस्खलन, दूष्काळ, कीड व राग प्रादूर्भाव इत्यादीचा सामावेश करण्यात आला. मात्र युद्ध व अणुयुद्धाचे दूष्परिणाम तसेच हेतूपुरस्सर केलेल्या नुकसानीमुळे होणाऱ्या नुकसानीस विमा संरक्षण मिळणार नाही. यावरून असे दिसते की, राष्ट्रीय कृषी विमा योजनेत नैसर्गिक कारणांमुळे नुकसान झाल्यास विमा संरक्षण दिले जाते.

विमा संरक्षण मर्यादा:

या योजनेत पिकांच्या उंबरठा उत्पन्नाच्या किमान आधारभूत किंमतीच्या दराने एकूण किंमती एवढ्या रकमेचा विमा उतरावा लागतो. शेतकऱ्यांना उंबरठा उत्पन्नापासून सरासरी उत्पन्नाच्या १५० टक्के पर्यंत विमा संरक्षण वाढविता येते. या वाढीव संरक्षित रकमेवर गणितशास्त्रावर आधारीत वास्तवदर्शी विमा दर लागू करण्यात येतो.

विमा हप्ता दर:

विमा संरक्षण रक्कमेवर विमा हप्त्याचे सर्वसाधारण दर पुढीलप्रमाणे आहेत.

अ) खरीप हंगाम: बाजरी व तेलबिया यासाठी ३.५० टक्के किंवा वस्तुनिष्ठ दर यापैकी जो कमी असेल तो दर.

ब) उर्वरीत खरीप पिकांसाठी २.५० टक्के किंवा वस्तुनिष्ठ दर यापैकी जो कमी असेल तो दर.

क) रब्बी हंगाम: गहू १.५० टक्के किंवा वस्तुनिष्ठ दर यापैकी जो कमी असेल तो दर.

ड) उर्वरीत रब्बी पिके: इतर तृणधान्य, डाळी आणि तेलबिया २ टक्के किंवा वस्तुनिष्ठ दर यापैकी जो कमी असेल तो दर.

इ) वार्षिक व्यापारी पिके वस्तुनिष्ठ ...